**नियमित फौजदारी खटला क्र. १६१/२०२३**
**निशाणी क्र. ७३/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ८ ची जबानी</u>**

माझे नांव - लक्ष्मण तुकाराम सरगर
वय वर्षे - ३५
सध्या - पोलीस उपनिरीक्षक पन्हाळा पोलीस ठाणे

**<u>सरतपास सरकारी वकील श्री.व्ही.पी.कुसुरकर यांच्यातर्फे -</u>**

१. सन २०२३ रोजी मी पोलीस उपनिरीक्षक वडगांव पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्यावेळेस माझ्याकडे गुरजि.नंबर ९६/२०२३ तपासासाठी वर्ग करण्यात आला होता. सदरच्या गुन्हामध्ये साक्षीदारांची तपास टिपणी नोंदविण्यात आली होती, घटनास्थळ पंचनामा करण्यात आला होता. सदरच्या गुन्हामध्ये पुराव्याकामी पेन ड्राईव्ह जप्ती पंचनामा करण्यात आला आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२. सदर प्रकरणामध्ये घटनास्थळ पंचनामा दरम्यान काढण्यात आलेल्या फोटोचे कलम ६५ब भारतीय पुरावा कायदा नुसार दाखल केलेले आहे. आता मला दि.२६/०२/२०२३ रोजीचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले आहे. ते तेच प्रमाणपत्र आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.७४** देण्यात येत आहे. तसेच मला दि.२४/०२/२०२३ रोजीचा आदेश ज्याच्याने मला सदर गुरजि.नंबर मध्ये तपास करण्याचे आदेश मिळाले तेही रेकार्डवर दाखल आहे. तो तोच आदेश आहे. त्यास **नि.७५** देण्यात येत आहे. आता मला घटनास्थळ पंचनामामध्ये ५ फोटोज दाखविण्यात आले. ते तेच फोटो आहेत ते पंचनामा करताना काढण्यात आले होते. त्यास **आर्टिकल अ ते** इ देण्यात येत आहे.

३. दि.०४/०३/२०२३ रोजीचा पेन ड्राईव्ह चा जप्तीचा पंचनामा मी केलेला आहे. पंच म्हणून उदसिंह दिपक भोपळे, सतिश जयवंत धनवडे यांनी पंच म्हणून पोलीस स्टेशन केली होती. सदर कामातील फिर्यादी कमाल पटवेगार यांनी पोलीस स्टेशनला पेन ड्राईव्ह हजर केला होता. त्योच हॅश व्हॅल्यू काढून पंचाच्या समक्ष तो जप्त करण्यात आला होता. आता मला दि.०४/०३/२०२३ रोजीचा पेन डाईव्ह जप्तीचा पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच पंचनामा आहे. दोन्ही पंचानी माझ्या समक्ष सही केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ७६** देण्यात येत आहे.

४.		दि. २५/०२/२०२३ रोजीचा साक्षीदार महेश बाबासो कांबळे यांच्या जबाबामधील तपास टिपण अधोरेखांकीत भाग अ त्यानी कथन केल्याप्रमाणे लिहून घेतलेले होते व त्यांने सांगीतल्याप्रमाणे लिहलेला आहे. तो बरोबर आहे. त्यास **नि.७७** देण्यात येत आहे.  घटनास्थळ पंचनामा मी केलेला आहे. घटनास्थळ कोडोली अर्बन बॅकेच्या शाखा वाठार च्या समोरील कच्या रस्त्यावर आहे. सदर घटनेस्थळावरुन स्टीलची वायफर पोकळ काठी, सिमेंटची वीट व चप्पल जप्त करण्यात आले होते. सदरच्या गुन्हामध्ये पुरावा प्राप्त झाल्यानंतर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.  आता मला पेन ड्राईव्ह दाखल केलेला लखोटा दाखविण्यात आला. त्यावर दोन्ही पंचाच्या व माझी सही आहे. त्यास **नि.७८** देण्यात येत आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.डी.पी.पाटील यांच्यातर्फे -</u>**

५.		सन २०२३ साली पोलीस निरिक्षक तळेकर साहेब होते. ते पोलीस स्टेशन इनचार्ज होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनचे इनचार्ज त्याच्या सहीखाली अधिपत्य असलेल्या अधिका-यांना तपास वर्ग करतात. हे म्हणणे खरे आहे की, आदेश स्वीकारल्यावर त्यावर अधिपत्य असलेला अधिकारी Endosment करतो. हे म्हणणे खरे नाही की, FIR व गुन्हा ज्याच्याकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला आहे त्याची नोंद स्टेशन डायरी घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला स्टेशन डायरी मेंन्टण्ट केली जाती व पोलीस स्टेशनमधील दैनंदीन ची माहीती त्यामध्ये लिहली जाते.

६.		हे म्हणणे खरे आहे की, स्टेशन डायरीमध्ये गुन्हयाची फोन वरुन मिळालेली बातमी, अटक केलेल्या आरोपीची माहीती तसेच गुन्हा दाखल झाला व तपासासाठी बाहेर गेला याची माहीती नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, तसेच गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनमधून बाहेर पडल्यास त्याचीही नोंद स्टेशन डायरीमध्ये केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा गुन्हा व तो मला तपासासाठी वर्ग करण्यात आल्याची नोंद स्टेशन डायरी मध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये स्टेशन डायरी एन्टी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की,  सदर गुन्हा बाबत दर्शविणारा स्टेशन डायरी एन्टी याकामामध्ये दाखल करु शकत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, Body offences मध्ये स्टेशन डायरी एन्टी जोडणे गरजेचे असते.  हे म्हणणे खरे नाही की,  सदर प्रकरणामध्ये स्टेशन डायरी एन्टी जोडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.७५ वरील आदेशावर माझे स्वाक्षरी

नाही.

७. तपासाच्या अनुषंगाने माझ्याकडे फिर्याद, फिर्यादीचा जबाब व आदेश वर्ग करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि.०५/०२/२०२३ रोजी फिर्यादी वडगांव पोलीस स्टेशनला आले होते हे तपासा दरम्यान आढळून आले. मला तपासा दरम्यान फिर्यादी दि.०५/०२/२०२३ रोजी पोलीस स्टेशनला आला होता व त्याने त्याचा जबाब नोंदविला किंवा पोलीसाकडून मदत मागीतली असे काय झाले नव्हते. माझ्या म्हणन्याप्रमाणे दि.०५/०२/२०२३ रोजी फिर्यादी पोलीस स्टेशनमध्ये आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादीमध्ये स्थावर मिळकतीवरुन वाद होता. तपासा दरम्यान आरोपी व फिर्यादी यांनी एकमेंकावर NC दाखल केली आहे किंवा कसे हे मला आढळून आले नाही.

८. तसेच तपासा दरम्यान फिर्यादीनी दि.०५/०२/२०२३ पासून ते फिर्याद दाखल करेपर्यंत म्हणजे दि.२४/०२/२०२३ पर्यंत अनेक अर्ज दाखल केले किंवा कसे हे माझ्या निर्दशनास आलेले नाही. तपासा दरम्यान फिर्यादीने अनेक अर्ज वरीष्ठाकडे दाखल केल्यामुहे व राजकीय दबावामुळे दि.२४/०२/२०२३ रोजी फिर्याद दाखल करण्यात आली होती किंवा कसे हे माझ्या निर्दशनास आलेले नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हा रहदारीचा व वाहनाच्या वाहतूकीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा झाल्यावर फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये फिर्यादीने लाकडी काठीने मारल्याचे सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने फियादीमध्ये लाकडी काठीने मारल्याचे सांगीतले असता ते घटनास्थळी मिळून न आल्यामुळे फिर्यादीचा घटनास्थळ पंचनामा झाल्यावर सोईप्रमाणे पुरवणी जबाब नोंदविण्यात आला होता. घटनास्थळी गेल्यावर फिर्यादीचे घर बघण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या घरी गेल्यावर फुटलेल्या कौलारु, दगड निर्दशनास न आल्यामुळे त्याचा घटनास्थळ पंचनाम्यामध्ये उल्लेख नाही. मी पंचनामा पाहीलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्यामध्ये त्याची नोंद नाही. पंचनामा हा वस्तुस्थती प्रमाणे केलेला आहे. वस्तुस्थीतीही पंचनामामध्ये का नमूद केलेली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या घरामध्ये कोणत्याही प्रकारचा नासधूस घडलेला नाही. पंचनामा करताना मला घटनास्थळी रक्तांचे डाग किंवा फिर्यादीचे पाकीट पडल्याचे निदर्शनास आलेले नाही. या घटनेमध्ये फिर्यादीचे कपडे फाटलेले होते व ते मी जप्त

केलेले नाही असे घडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळच्या आजूबाजूला कोडोली अर्बन को ऑप बँक व राहते घर व दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, इतर लोकांचे साक्ष नोंदविलेले नाहीत.

११. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने पुरवणी जबाब देताना पोलीसांनी मला एक आठवडयानंतर सांगीतले होते की, त्या इसमाचे नांव महेश कांबळे आहे व लाकडी काठी नसून ती स्टीलची पाईप आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसेच पुरवणी जबाब देताना फिर्यादीने दि.०५/०२/२०२३ रोजी घडलेल्या घटनेबाबत तौफीक शेख व मौसीम पोवाडे यांनी फिर्यादीला आरोपी परत अशी घटना घडविणार नाही व फिर्यादी दाखल करु नकोस म्हणून आश्वासन दिले हे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुरवणी जबाबमध्ये वरील नमुद फिर्यादीचा जबाब नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र. ६ मिनाज पटवेगार ने कोर्टामध्ये दिलेला जबाब '' मी बाहेर अंथरुण वाळत घातले होते ते अनारकली व अकील नदाफने ते खाली पाडून विस्कटून टाकले'' ''फजल नदाफ ने वीट उचलली व माझ्या पतीला मारायला गेले असता माझा मुलगा जैद मध्ये आल्यामुळे त्याच्या हाताला लागले होते.’’ हे तीच्या पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी घटनेचे कोणतेही खाणाखूणा दिसून आले नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, नि.७७ वर दाखल केलेल्या लखोटयावर लाखेचे सील नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्याच्याकडून पेन डाईव्हचे हॅश व्हल्यू काढून घेतले त्यांचे अनुभवाचे प्रमाणपत्र किंवा शैक्षणीक प्रमाणपत्र घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पेन ड्राईव्हमधील फाईलला ओरीजनल व्हीडोओ सोबत तूलना (compare) केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ रेर्कार्डींग सोबत पेन ड्राईव्ह मधील व्हीडीओ बरोबर आहे किंवा कसे यांची तुलना केलेली नाही. फिर्यादीने दाखल केलेला व्हीडीओ फाईल्स् किती तारखेला create केले याचा तपास मी केलेला नाही. मी तपासादरम्यान फिर्यादीने व्हीडीओ कोणाकडून आणले याचाबाबत खातरजमा केलेली नाही. तपासादरम्यान फिर्यादीने दि.२४/२/२०२३ रोजी फिर्याद देत असताना त्याच्यासोबत सी.सी.टीव्ही फुटेचा पेन डाईव्ह असल्याबाबतचे पोलीसांना सांगीतलेले माझ्या निर्देशनास आलेले नाही. इलेक्ट्रॉनिक गॅजेट जप्त केल्यानंतर त्याच्या स्टोअरेज बाबत सुची व Norms आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. चार्जशीट दाखल करण्यापूर्वी सदर गुन्हयाबाबतचा पेन ड्राईव्ह माझ्या ताब्यामध्ये होता.

१३. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामाचे फोटो व कलम ६५ ब चे

प्रमाणपत्र हे चुकीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी कमाल पटवेगार यांनी पोलीस स्टेशनला पेन ड्राईव्ह हजर केला होता, त्योच हॅश व्हॅल्यू काढून पंचाच्या समक्ष तो जप्त करण्यात आला होता, दोन्ही पंचानी माझ्या समक्ष सही केलेली आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि. ७६** देण्यात येत आहे, हे चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५/०२/२०२३ रोजीचा साक्षीदार महेश बाबासो कांबळे यांच्या जबाबामधील तपास टिपण अधोरेखांकीत भाग अ त्यानी कथन केल्याप्रमाणे लिहून घेतलेले होते व त्यांने सांगीतल्याप्रमाणे लिहलेला आहे, तो बरोबर आहे, त्यास **नि.७७** देण्यात येत आहे, हे चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेस्थळावरुन स्टीलची वायफर पोकळ काठी, सिमेंटची वीट व चप्पल जप्त करण्यात आले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटा तपास करुन चुकीचा दोषारोपत्र दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

(आर.एस.मोरे)

दि. ०४/०३/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव